# पार्किन्सोनिझम आणि पूर्णोपचार



**डॉ. दीपक रोकडे**

पार्किन्सोनिझम हा हळूहळू वाढत जाणारा मेंदूचा एक डिजनरेटीव्ह विकार असून, मेंदूच्या नेहमी आढळणाऱ्या आजारातील दुसऱ्या क्रमांकाचा विकार आहे. या आजारामुळे स्नायूंचे नियंत्रण कमी होत जाते व त्यामुळे रुग्णाला शरीराला, हातापायांना कंप होणे, हालचाली मंदावणे, शरीर कडक होणे, अशा त्रासाला तोंड द्यावे लागते.

**पार्किन्सन्सची लक्षणे कोणती?**

हा आजार मुख्यत: वयाच्या ६० वर्षांनंतर आढळत असला तरी कमी वयाच्या स्त्री-पुरुषांमध्ये सुद्धा (वय २१ते ४०) तो दिसू शकतो.

आजाराची सुरुवात शरीराच्या डाव्या अथवा उजव्या बाजूकडे होते. हातांना, पायांना, कंप सुटणे, हालचाली मंदावणे, शरीर कडक होणे, तोल जाणे ही लक्षणे प्रामुख्याने दिसतात.

**दुय्यम लक्षणे**

कॉन्स्टीपेशन, मानसिक ताण, डिप्रेशन, असुरक्षिततेची भावना, शरीरसंबंधातील अडचण, चालणे व बोलणे अवघड होणे.

**पार्किन्सोनिझम कशामुळे होतो?**

हा आजार नेमका कशामुळे होतो हे अद्याप आधुनिक वैद्यकशास्त्राला समजलेले नाही. मेंदूतील सबस्टॅन्शिया नायग्रा या भागातील पेशींमध्ये डोपामाईन नावाचे एक द्रव्य तयार होणे कमी होते. डोपामाईन हे मेंदूतील संदेशवहनासाठी एक अत्यावश्यक घटक आहे, तेच कमी झाल्यामुळे संदेशवहनात अडथळे यायला सुरुवात होते व त्यामुळेच मेंदूचे स्नायूंवरचे नियंत्रण कमी होऊन आजाराची लक्षणे दिसू लागतात.

या पेशी डोपामाईन तयार करणे का थांबवतात हे मात्र अजूनही समजलेले नाही.

हळूहळू मेंदूतील इतर पेशींचे काम सुद्धा बिघडायला लागते व इतर लक्षणांचा सुद्धा प्रादुर्भाव होतो.

**पार्किन्सोनिझमवर उपचार कुठले?**

डोपामाईन तयार होण्याचे प्रमाण कमी होते पण ते का होते हे माहीत नसल्याने या आजारावर ॲलोपॅथी समूळ उच्चाटन करण्याची कारवाई करु शकत नाही. कृत्रिम डोपामाईन बाहेरून घेऊन आजाराच्या लक्षणांवर तात्पुरता उपचार केला जातो; पण हळूहळू ॲलोपॅथी औषधे सुद्धा निरुपयोगी ठरू लागतात. तसेच, मेंदूच्या इतर पेशींचे कार्य बिघडू लागते व त्यासाठी तर डोपामाईनच्या काहीच संबंध नसल्याने रुग्ण हळूहळू खराब होत जातो.

**पूर्णोपचार म्हणजे काय ?**

'पूर्णोपचार' ही मी स्वत: अनेक वर्षांच्या वैद्यकीय व्यवसायाच्या अनुभवातून विकसित केलेली एक आगळी वेगळी उपचार प्रणाली आहे. मी मूळचा ॲलोपॅथीतील बालरोग तज्ज्ञ डॉक्टर आहे (बी जे मेडिकल कॉलेज पुणे)सुरुवातीच्या ५-६ वर्षांतच मला ॲलोपॅथीच्या मर्यादा, औषधांचे भयावह दुष्परिणाम, अनावश्यक तपासण्या आणि विनाकारण केल्या जाणाऱ्या शस्त्रक्रिया यांचा अनुभव आला. त्यामुळे मी इतर पॅथींचा अभ्यास केला. आयुर्वेद, ॲक्युपंक्चर, होमिओपॅथी, योगा, प्राणायाम, सुयोग्य जीवनशैली व्यायाम आणि संतुलित आहार या सर्वांचा ॲलोपॅथी सोबत वापर केल्यास अनेक तथाकथित असाध्य आजारांचे निराकरण करता येते, हे मी अनुभवले व हळूहळू या सर्व पॅथींचे रुग्णाच्या गरजेनुसार योग्य असे एकत्रीकरण करणे मी शोधून काढले. आजारावर सर्वांगीण उपचार करणारी, त्याचे समूळ उच्चाटन करणारी प्रणाली म्हणून तिचे नामकरण केले '**पूर्णोपचार**'!

सर्व पॅथींमधील दोष वगळून, गुण मात्र वाढवणाऱ्या या '**पूर्णोपचारां**'चा रुग्णांनी व त्यांच्या नातलगांनी आता आग्रह

धरायला हवा. म्हणजे इतर डॉक्टरसुद्धा आपापल्या पॅथींचा वृथा अभिमान सोडून 'पूर्णोपचारा'कडे वळतील असा मला विश्वास आहे.

हृदयविकार, उच्च रक्तदाब, मधुमेह, संधिवात, किडनी फेल्युअर, पोटाचे, त्वचेचे, नाक, कान, घसा, डोळे यांचे असाध्य विकार, मतिमंदत्व, सेरेब्रल पाल्सी, फीटस् येणे, मुकबधिरता, मेंदूचे विकार, मानसिक आजार, निद्रानाश, मूल न होणे, स्त्रियांचे पाळीचे विकार, PCOD श्वसनाचे विकार, दमा, ॲलर्जी, COPD इत्यादी विकार पूर्ण बरे झालेले मी माझ्याकडे अनुभवतो आहे.

**पूर्णोपचाराचा पार्किन्सोनिझमसाठी फायदा होतो काय?**

निश्चितच खूप फायदा होतो. चालणे, बोलणे, शरीराचा कडकपणा, नैराश्य, चालताना तोल जाणे या लक्षणांमध्ये पूर्णोपचारांचा अतिशय चांगला फायदा होतो. असे दिसून येते. प्रत्येक रुग्णाला प्रथम भेटीमध्ये संपूर्ण शरीराचा 'एनर्जी स्कॅन' करावा लागतो. आजाराच्या मूळ कारणाचा वेध या स्कॅनद्वारे घेतला जातो व त्यानंतर त्यावर कोणकोणत्या पॅथींचा काय काय उपचार करायचा ते ठरवले जाते. पूर्णोपचारामुळे ॲलोपॅथी औषधे उशिरा सुरु करता येतात तसेच, त्यांचा डोस कमी ठेवला जातो व परिणामकारकता जास्त काळ टिकवली जाते.

बहुसंख्य रुग्णांसाठी ॲक्युपंक्चर (वेदनारहित इंपोर्टेड सुयांपासून) व पंचकर्म एवढेच उपचार पुरेसे ठरतात. पुढे आवश्यकता वाटल्यास ॲलोपॅथीची औषधे कमी प्रमाणात सुरू करता येतात.

**पूर्णोपचार किती काळ द्यावे लागतात?**

पार्किन्सोनिझम या आजारासाठी सुरुवात ॲक्युपंक्चर व पंचकर्माने होते. पुढे पंचकर्म संपल्यावर फक्त ॲक्युपंक्चर आठवड्यातून एक वेळा व ॲलोपॅथीची औषधे नियमित घ्यावी लागतात.

हा उपचार काही रुग्णांना कायम घ्यावा लागतो, तर काही रुग्णांना मात्र काही वर्षांनंतर बंद करता येऊ शकतो.


**संपर्क**

श्रीगंगा क्लिनिक व हॉस्पिटल

६१२, नाना पेठ, घोडेपीरासमोर,

अल्पना टॉकीजजवळ, १ लक्ष्मी रोड, पुणे ४११००२.

**भ्रमणभाष** : ९४२०१७९८३९ / ९७६३७६३०४३